# महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

एम एम टी सी हाऊस, पाचवा मजला,
प्लॉट क्र. सी २२, ब्लॉक - ई,
वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पुर्व), मुंबई - ४०० ०५१.

संकेत स्थळ : www.mahabocw.in
दुरध्वनी व फॅक्स क्र. : 022-2657 2631
ई-मेल : bocwwboardmaha@gmail.com


जा.क्र./253/२०२३/संप्रणा-२०२३/प्र.क्र.१/योजना-०२ दिनांक :- 05 FEB 2025

प्रति,

१. अपर कामगार आयुक्त/कामगार उप आयुक्त
कोकण/पुणे/नागपूर/अमरावती/ नाशिक, छ.संभाजीनगर

२. कामगार उप आयुक्त/सहायक कामगार आयुक्त/जिल्हा कामगार
अधिकारी, जिल्हा कामगार सुविधा केंद्र (सर्व)

**विषय:- एकात्मिक कल्याणकारी मंडळ संगणकीय प्रणाली (IWBMS) वर प्राप्त होणा-या बांधकाम कामगारांच्या नोंदणी/नुतनीकरण/लाभ वाटप अर्जावर करावयाच्या कार्यवाहीवर सर्वकष सूचना देणेबाबत.**

संदर्भ:- १. मंडळाचा पुरवठा आदेश पत्र क्रमांक मइवइबाकमं/IWBMS/ ४५४/२०१९, दिनांक ०८ मार्च,२०१९.

२. मंडळाचे पत्र क्रमांक इवइबाकाकमं/IWBMS/२१७०/२०१९,दिनांक २८ नोव्हेंबर,२०१९.

३. मंडळाचे पत्र क्रमांक इवइबाकाकमं/IWBMS/२३८५/२०२०,दिनांक ०२ जानेवारी,२०२०.

४. मंडळाचे पत्र क्रमांक इवइबाकाकमं/कार्यपद्धती/८४१/२०२०,दिनांक २३ जुलै,२०२०.

५. मंडळाचे पत्र क्रमांक क्र.यो/२०२२/प्र.क्र.७/संकिर्ण-२,दिनांक १२ एप्रिल,२०२२.

६. उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाचे पत्र क्रमांक इबांका-१९२२/प्र.क्र.१८९/काम ७, दिनांक ०९ नोव्हेंबर,२०२२.

७. उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाचे पत्र क्रमांक इबांका-०४२३/प्र.क्र.५८/कामगार-७, दिनांक १२ सप्टेंबर,२०२३.

८. मंडळाचे पत्र क्रमांक १८८५/२०२३/संप्रणा-२०२३/प्र.क्र.०१/योजना-०२, दिनांक २० आक्टोंबर,२०२३.

९. मंडळाचे पत्र क्रमांक १९९४/२०२३/संप्रणा-२०२३/प्र.क्र.०१/योजना-०२, दिनांक ०३ नोव्हेंबर,२०२३.

१०. मंडळाचे पत्र क्रमांक २११४/२०२३/संप्रणा-२०२३/प्र.क्र.०१/योजना-०२, दिनांक २२ नोव्हेंबर,२०२३.

११. उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभागाची अधिसूचना क्रमांक:-इबांका-०५२३/प्र.क्र.७६/कामगार-७, दिनांक ३० नोव्हेंबर,२०२३.

१२. मंडळाचे कार्यारंभ आदेश क्रमांक ३०२९/२०२४/कासुकें-२०२३/प्र.क्र.०१/योजना-०१, दिनांक १५ मार्च,२०२४.

१३. मंडळाचे पत्र क्रमांक १३५०/२०२४/प्रशास-२०२४/प्र.क्र.५०/आस्थापना-०१, दिनांक १७ आक्टोंबर,२०२४.

१४. मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचे आदेश दिनांक ०६ नोव्हेंबर, २०२४

१५. मंडळाचे आदेश क्रमांक १४६३/२०२४/न्याप्र-२०२४/प्र.क्र.६१७/समन्वय-१, दिनांक ०८ नोव्हेंबर,२०२४

इमारत व इतर बांधकाम व्यवसायामधील कामगारांच्या हिताचे रक्षण करण्याच्या दृष्टीने, केंद्र शासनाने इमारत व इतर बांधकाम कामगार अधिनियम (रोजगार नियमन व सेवाशर्थी), १९९६ लागू केला आहे. सदर अधिनियमामधील कलम (१८) नुसार प्रत्येक राज्याने इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ गठीत करावयाचे आहे. त्याअनुषंगाने, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्थी) नियम, २००७ अस्तित्वात आले असून, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची स्थापना करण्यात आलेली आहे.

२. बांधकाम क्षेत्रामध्ये काम करणा-या कामगारांची नोंदणी / नुतनीकरण मंडळाअंतर्गत करण्यात येत असून, त्यांना विविध योजनेंचे लाभ वितरीत करण्यात येतात.याकरीता संदर्भाधीन क्र. (०१) ते (०५) अन्वये एकात्मिक कल्याणकारी मंडळ संगणकीय प्रणाली (IWBMS) विकसित करण्यात आली आहे.सदर प्रणालीकरीता https://mahabocw.in/ हे संकेतस्थळ निर्माण करण्यात आले आहे.

३. सदर प्रणालीद्वारे राबविण्यात येणा-या नोंदणी/नुतनीकरण/लाभ वाटप प्रक्रियेमध्ये कोविड - १९ च्या पार्श्वभूमीवर काही ठराविक अर्ज शोधून (Search)

त्यावर कार्यवाही करणे, एकाच मोबाईल नंबरवर (Master Mobile OTP) अनेक अर्जाच्या नोंदी होणे,Filter ची सुविधा वापरून ठराविक योजनांच्या अर्जावर कार्यवाही करणे अशा प्रकारच्या बाबी घडत होत्या. बांधकाम कामगारांच्या नोंदणी व नुतनीकरणातील तांत्रिक अडचणी कमी करून नोंदणी व नुतनीकरणामध्ये वाढ करणे आवश्यक आहे.वास्तविकत: बांधकाम कामगारांचे प्राप्त होणारे अर्ज हे कोणत्याही मानवी हस्तक्षेपाशिवाय संगणकीय प्रणालीद्वारे प्राथम्यक्रमानुसार (First Come First Serve) निकाली काढणे आवश्यक आहे.या सर्व बाबींचा विचार करून, शासनाच्या संदर्भीय क्र. (०६) येथील पत्रामधील निर्देश विचारात घेवून, सविस्तर सूचना देण्यात आल्या होत्या.तसेच, संदर्भीय क्र. (०७) ते (१०) अन्वये वेळोवेळी आवश्यकतेनुसार सविस्तर सूचना देण्यात आल्या आहेत.

**४.** केंद्र शासनाच्या इमारत व इतर बांधकाम कामगार अधिनियम (रोजगार नियमन व सेवाशर्थी), १९९६ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार संदर्भाधीन क्र. (११) अन्वये राज्य शासनाने विविध योजना अधिसूचित केल्या आहेत.सदर अधिसूचनेतील नियम क्र.(३) (ब) मध्ये तालुका इमारत कामगार सुविधा केंद्र निर्माण करण्याची तरतूद आहे.

**५.** मागील दोन वर्षाच्या कालावधीमध्ये बांधकाम कामगारांच्या नोंदणीचे प्रमाण वाढत चालले असून, जिल्हास्तरावर निर्माण केलेली कार्यालय व मनुष्यबळ अपुरे पडू लागले होते.बांधकाम कामगारांच्या नोंदणी/नुतनीकरण/लाभ वाटप प्रक्रियेमध्ये अधिकची पारदर्शकता व सुलभता आणण्याच्या दृष्टीने संदर्भाधीन क्र. (१२) अन्वये प्रत्येक तालुकाच्या ठीकाणी तालुका इमारत कामगार सुविधा केंद्र निर्माण करण्यात आली आहेत.

**६.** दरम्यान,महाराष्ट्र विधानसभा निवडणूक-२०२४ च्या आदर्श आचारसंहितेच्या पार्श्वभूमीवर संदर्भाधीन क्र. (१३) अन्वये, बांधकाम कामगारांच्या नोंदणी / नुतनीकरण / लाभ वाटप बाबतची एकात्मिक कल्याणकारी मंडळ संगणकीय प्रणाली (IWBMS) बंद ठेवण्यात आली होती.यासंदर्भात मा.उच्च न्यायालय,मुंबई येथे दाखल याचिका क्र. ३३५९७/२०२४ मध्ये सदरची ऑनलाईन प्रणाली सुरू करण्याचे निर्देश संदर्भाधीन क्र. (१४) अन्वये मा.न्यायालयाने दिले होते. त्या अनुषंगाने, संदर्भाधीन क्र. (१५) अन्वये सदरची ऑनलाईन प्रणाली सुरू करण्यात आली होती.दिनांक ०८ नोव्हेंबर, २०२४ ते दिनांक ०३ फेब्रुवारी,२०२५ अखेर सदर प्रणालीमार्फत १,४८,०६०नोंदणी,१,०५,८३६

नुतनीकरण व २,५८,६८५ लाभ वाटप असे एकूण ५,१२,५८१ अर्ज ऑनलाईन पद्धतीने हाताळण्यात आले आहेत.

७. बांधकाम कामगारांसाठी निर्माण करण्यात आलेली एकात्मिक कल्याणकारी मंडळ संगणकीय प्रणाली (IWBMS) ही ऑनलाईन असून, जिल्हा इमारत कामगार सुविधा केंद्र व तालुका इमारत कामगार सुविधा केंद्र बांधकाम कामगारांच्या सुविधेकरीता निर्माण करण्यात आली आहे.योग्य बांधकाम कामगारांची नोंदणी/नुतनीकरण/लाभ वाटप करण्याकरीता सदरच्या ऑनलाईन प्रणालीमध्ये अधिकची सुलभता, सुसत्रता व पारदर्शकता आणण्याच्या दृष्टीने खालीलप्रमाणे सुधारीत सूचना देण्यात येत आहेत :-

८. **नोंदणी व नुतणीकरणासाठी अर्ज सादर करणे**

(अ) बांधकाम कामगार ऑनलाईन पद्धतीने https://mahabocw.in/ या संकेतस्थळावर नोंदणी / नुतनीकरण करीता अर्ज सादर करतील.

(ब) अर्ज सादर करतेवेळी आधार कार्ड व ज्यादिवशी अर्ज सादर केला आहे त्या दिनांकापासून मागील एक वर्षात ९० दिवस बांधकाम कामगार म्हणून काम केले असल्याचे प्रमाणपत्र अनिवार्य राहील. **प्रपत्र - अ** नुसार नोंदणीकरीता आवश्यक कागदपत्रे राहतील.

(क) नोंदणीकरीता ९० दिवसाचे प्रमाणपत्र हे खाजगी बांधकाम व्यावसायिकाचे प्रमांणपत्र /शासकीय प्राधिकरणाचे प्रमाणपत्र / नाका कामगार पुस्तिका ग्राह्य धरण्यात यावी.

(ड) ज्या दिनांकास नोंदणी मंजूर करण्यात येईल त्या दिनांकापासून नोंदणीचा कालावधी एक वर्षापर्यंत राहील.

(इ) बांधकाम कामगाराची नोंदणी मुदत संपण्यापुर्वी एक महिना अगोदरपासून ऑनलाईन पद्धतीने https://mahabocw.in/ या संकेतस्थळावर नुतनीकरणाकरीता अर्ज सादर करू शकेल.

(ई) नुतनीकरणाकरीता अर्ज सादर करतेवेळी ज्यादिवशी अर्ज सादर केला आहे त्या दिनांकापासून मागील एक वर्षात ९० दिवस बांधकाम कामगार म्हणून काम केले असल्याचे प्रमाणपत्र अनिवार्य राहील. **प्रपत्र - ब** नुसार नुतनीकरणाकरीता आवश्यक कागदपत्रे राहतील.

(च) नुतनीकरणाकरीता ९० दिवसाचे प्रमाणपत्र हे खाजगी बांधकाम व्यावसायिकाचे प्रमाणपत्र /शासकीय प्राधिकरणाचे प्रमाणपत्र / नाका कामगार पुस्तिका ग्राह्य धरण्यात यावी.

(झ) नुतनीकरणाकरीता ९० दिवसाचे प्रमाणपत्र हे केवळ मागील एक वर्षामधील असणे आवश्यक आहे त्यापुर्वीच्या वर्षामधील ९० दिवसाचे प्रमाणपत्र असण्याची आवश्यकता नाही.

(ज) ज्या दिनांकास नुतनीकरण मंजूर करण्यात येईल त्या दिनांकापासून नुतनीकरणाचा कालावधी एक वर्षापर्यंत राहील.

(झ) नोंदणी / नुतनीकरणाची प्रक्रिया **प्रपत्र-क** नुसार राहील.

(क) बांधकाम कामगारास ऑनलाईन पद्धतीने नोंदणी / नुतनीकरणा करीता अर्ज सादर करतेवेळी मुळ कागपत्रांच्या तपासणीकरीता / ऑनलाईन फोटो देण्याकरीता /बायोमेट्रीक करीता त्यांच्या सोईनुसार दिनांकाची निवड करावी लागेल.

(ख) निवडलेल्या दिनांकास बांधकाम कामगार तालुका इमारत कामगार सुविधा केंद्रावर मुळ कागदपत्रांच्या तपासणीकरीता हजर राहील व ऑनलाईन फोटो /बायोमेट्रीक घेण्यात येईल.

(ग) ज्या तालुक्यामधील ९० दिवसाचे प्रमाणपत्र असेल तेच तालुका इमारत कामगार सुविधा केंद्र निवडणे बांधकाम कामगारास निवडणे अनिवार्य राहील, अन्यथा इतर सुविधा केंद्रावर त्यांच्या कागदपत्राची पडताळणी होणार नाही व अर्ज रद्द करण्यात येईल.

(घ) निवडलेल्या दिनांकास बांधकाम कामगार सुविधा केंद्रावर हजर न राहील्यास त्यांचा अर्ज रद्द होईल व त्यांना पुनश्चः अर्ज करावा लागेल.

९. **लाभासाठी अर्ज सादर करणे**

(अ) बांधकाम कामगार ऑनलाईन पद्धतीने https://mahabocw.in/ या संकेतस्थळावर लाभाकरीता करीता अर्ज सादर करतील.

(ब) अर्ज सादर करतेवेळी प्रत्येक योजनेनिहाय आवश्यक असणारी कागदपत्रे अर्जासोबत ऑनलाईन पद्धतीने सादर करणे आवश्यक राहील. योजनानिहाय आवश्यक कागदपत्रांचा तपशिल **प्रपत्र - ड** नुसार राहतील.

(क) बांधकाम कामगारास ऑनलाईन पद्धतीने लाभाकरीता करीता अर्ज सादर करतेवेळी मुळ कागपत्रांच्या तपासणीकरीता त्यांच्या सोईनुसार दिनांकाची निवड करावी लागेल.

(ड) निवडलेल्या दिनांकास बांधकाम कामगार तालुका इमारत कामगार सुविधा केंद्रावर मुळ कागदपत्रांच्या तपासणीकरीता हजर राहील व ऑनलाईन फोटो /बायोमेट्रीक घेण्यात येईल.

(इ) लाभाच्या अर्जाची प्रक्रिया **प्रपत्र-इ** नुसार राहील.

(ई) ज्या तालुका इमारत कामगार सुविधा केंद्रामध्ये बांधकाम कामगारची नोंदणी असेल त्याच सुविधा केंद्रावर त्यांच्या कागदपत्राची पडताळणी होईल.

(च) निवडलेल्या दिनांकास बांधकाम कामगार सुविधा केंद्रावर हजर न राहील्यास त्यांचा अर्ज रद्द होईल व त्यांना पुनश्चः अर्ज करावा लागेल.

१०. **नोंदणी / नुतणीकरण / लाभ वाटप लिपिक लॉग-ईन आय.डी.**

(अ) तालुका इमारत कामगार सुविधा केंद्रास ऑनलाईन पद्धतीने सादर होणा-या नोंदणी / नुतणीकरण / लाभ वाटप यांचे अर्ज प्राथमिक छानणीकरीता प्रथम लिपिक लॉग-ईन आय.डी. मध्ये येतील.

(ब) संबधित बांधकाम कामगार / वारस यांनी तपासणीकरीता निवडलेल्या दिवशी सर्व मुळ कागदपत्रांसह संबधित तालुका इमारत कामगार सुविधा केंद्रात प्रत्यक्ष उपस्थित राहील.

(क) प्रत्येक तालुका इमारत कामगार सुविधा केंद्रा करीता तीन नोंदणी / नुतणीकरण / लाभ वाटप लिपिक लॉग-ईन आय.डी. निर्माण करण्यात आले असून, सर्व तीनही लॉग-ईन आय.डी. मध्ये नोंदणी / नुतणीकरण / लाभ वाटपाचे अर्ज दिसतील. प्रत्येक लॉग-ईन आय.डी. द्वारे ५० अर्ज तपासणी होतील. यानुसार एका तालुका इमारत कामगार सुविधा केंद्रामध्ये १५० अर्ज तपासणीकरीता निश्चित करण्यात आले आहेत.प्रत्येक तालुका इमारत कामगार सुविधा केंद्रामध्ये येणा-या अर्जांचा ओघ विचारात घेवून, सदरची क्षमता कमी अथवा जास्त करण्यात येईल.

(ड) सर्व तीनही लॉग-ईन आय.डी. मध्ये संबधित दिवसाकरीता तपासणीकरीता निश्चित केलेले सर्व अर्ज उपलब्ध असतील. तीनही

लॉग-ईन आय.डी. मध्ये संबधित दिवसाकरीता तपासणीकरीता निश्चित केलेले अर्ज शोधण्याची सुविधा (Search) उपलब्ध करून देण्यात आली असून,तपासणीकरीता आलेल्या बांधकाम कामगार/वारस यांना क्रमाने टोकन वाटप करण्यात यावेत व शोधण्याची सुविधा (Search) वापरून कार्यवाही करण्यात यावी.

(इ) बांधकाम कामगार/वारस यांनी सादर केलेली मुळ कागदपत्रे योग्य असल्याची खातरजमा झाल्यानंतर संबधित लिपिकाने "सर्व मुळ कागदपत्रे योग्य" हा शेरा नमूद करावा. तद्नंतर संबधित बांधकाम कामगार/वारस यांचा फोटो (Online Photo Capturing) व त्यांच्या बोटाचे ठसे (शक्यतो अंगठा अथवा कोणतेही एक बोट) बायोमॅट्रीक पद्धतीने संगणक प्रणालीमध्ये नोंदविण्यात यावेत.

(ई) बांधकाम कामगार/वारस यांनी सादर केलेली मुळ कागदपत्रे अपूर्ण असल्यास कोणती मुळ कागदपत्रे नाहीत हे स्पष्ट नमूद करून अर्ज परत करावा व "---- हे मुळ कागदपत्र अपूर्ण" हा शेरा नमूद करावा.

(च) बांधकाम कामगार/वारस यांनी सादर केलेली मुळ कागदपत्रे चुकीची/बनावट /संशयास्पद आढळून आल्यास संबधित लिपिकाने सदरची बाब तातडीने तालुका इमारत कामगार सुविधा केंद्राचे प्रमुख यांच्या निदर्शनास आणून द्यावी व अशाप्रकरणी आवश्यक ती पुढील कार्यवाही करावी.

(छ) "सर्व मुळ कागदपत्रे योग्य" व "---- हे मुळ कागदपत्र अपूर्ण" या दोन शे-या व्यतिरीक्त अन्य कोणतेही शेरे लिपिक यांनी नमूद करू नयेत.

(ज) "सर्व मुळ कागदपत्रे योग्य" व "---- हे मुळ कागदपत्र अपूर्ण" या दोन शे-यांचे रबर स्टॅम्प बनवून प्रत्येक लॉन-ईन आय.डी धारक लिपिकास त्यांचे नाव नमूद करून देण्यात यावेत. बांधकाम कामगार/वारस यांच्या मुळ कागदपत्र तपासणीअंती संबधित लॉन-ईन आय.डी धारक लिपिकाने उपरोक्त दोनपैकी एका शे-याचा रबर स्टॅम्प नमूद करून त्यांचा अर्ज परत करावा. रबर स्टॅम्प नमूना **प्रपत्र-ई** मध्ये जोडला आहे.

(झ) "सर्व मुळ कागदपत्रे योग्य"व "---- हे मुळ कागदपत्र अपूर्ण" यापैकी एक शेरा ऑनलाईन पद्धतीने नमूद करून अर्ज पुढील कार्यवाहीस्तव नोंदणी अधिका-यास सादर करावा.

(ट) ऑनलाईन पद्धतीने सादर होणा-या अर्जाची तपासणी करताना सोबत जोडलेल्या **प्रपत्र - ड** नुसार योजनानिहाय मुळ कागदपत्रांची तपासणी करावी. याव्यतिरीक्त अन्य कोणत्याही कागदपत्रांची मागणी करण्यात येवू नये.

(ठ) बांधकाम कामगारांची नोंदणी जिवीत (सक्रिय) असल्याशिवाय ऑनलाईन पद्धतीने लाभाचा अर्ज संगणक प्रणालीमध्ये स्वीकृत होत नाही.तथापि, सदरचा अर्ज निकाली निघेपर्यंत सदरच्या बांधकाम कामगाराचा नोंदणी कालावधी संपुष्टात येवू शकतो.सबब,बांधकाम कामगारांची नोंदणी जिवीत (सक्रिय) नाही या कारणास्तव अर्ज रद्द करण्यात येवू नये.तथापि, योजनेनुसार निश्चित केलेल्या मुळ कागपत्रांची छानणी करून पात्र अर्ज मंजूर करण्यात यावेत.प्राथम्यक्रमानुसार (First Come First Serve) सदरचे अर्ज छानणी करण्यात येतील व आवश्यक त्या शे-यानुसार अर्ज नोंदणी अधिका-यांकडे पाठविण्यात येतील.

११. <u>तालुका नोंदणी अधिकारी लॉग-ईन आय.डी.</u>

(अ) जिल्हा कामगार सुविधा केंद्रानिहाय देण्यात आलेले लॉग-ईन आय.डी. यापूर्वीच बंद करण्यात आले असून, तालुकानिहाय लॉग-ईन आय.डी. यापूर्वीच जिल्हा कामगार सुविधा केंद्राच्या प्रमुखांना उपलब्ध करून देण्यात आलेले आहेत.

(ब) प्राप्त होणा-या नोंदणी, नुतनीकरण व लाभांच्या अर्जांचे तालुकानिहाय विभागणी करण्यात आली असून, संबधित तालुका लॉग-ईन आय.डी. मध्ये सदरचे नोंदणी, नुतनीकरण व लाभाचे अर्ज दिसतील.

(क) तालुका इमारत कामगार सुविधा केंद्राच्या नोंदणी / नुतणीकरण / लाभ वाटप लिपिक लॉग-ईन आय.डी. मधून शेरा नोंद होवून, अर्ज संबधित तालुक्याच्या तालुका लॉग-ईन आय.डी. मध्ये दिसतील.

(ड) जिल्हा कामगार सुविधा केंद्राच्या प्रमुखांनी त्यांचेकडे उपलब्ध असलेले नोंदणी अधिकारी व संबधित तालुक्यामधील अर्जांचा ओघ विचारात घेवून, तालुका लॉग-ईन आय.डी. निहाय नोंदणी अधिका-यांची नियुक्ती करावी.

(इ) नोंदणी अधिका-यास अर्जाबाबत स्वीकृत (Accept) अथवा नाकारणे (Reject) हे दोनच पर्याय देण्यात आले आहेत.त्यानुसार कार्यवाही करणे अपेक्षित आहे.

**१२. लाभ वाटप अर्जाकरीता जिल्हा इमारत कामगार सुविधा केंद्रासाठी मूळ कागदपत्रे पडताळणीकरीता यापूर्वी घेण्यात आलेल्या दिनांकाबात करावयाची कार्यवाही**

(अ) लाभ वाटप अर्जाकरीता यापूर्वी बांधकाम कामगारांनी कागदपत्रे पडताळणीकरीता घेतलेले दिनांक हे जिल्हास्तरावरील होते व त्यांना सन २०२६ पर्यतचे दिनांक मिळाले होते.त्यांना तालुकास्तरावर नजीकचे दिनांक उपलब्ध करून देण्याकरीता पूर्वीचे दिनांक आता रद्द होतील.

(ब) बांधकाम कामगारांनी त्यांच्या पुर्वीच्या घेतलेल्या दिनांकाचा Acknowledgement क्रमांक ऑनलाईन प्रणालीमध्ये नमूद करून, तालुका इमारत कामगार सुविधा केंद्राचा त्यांच्या सोईनुसार दिनांक पुनश्च: घ्यावा.

**१३. जिल्हा इमारत कामगार सुविधा केंद्राची जबाबदारी**

(अ) यापूर्वी निर्माण करण्यात आलेली जिल्हा इमारत कामगार सुविधा केंद्र हे जिल्ह्याच्या मुख्यालयाच्या ठीकाणी असून, प्रत्येक केंद्रामध्ये पाच डाटा ऐंट्री ऑपरेटर आहेत.

(ब) सदरचे केंद्र हे जिल्हा मुख्यालय असेल्या तालुक्याकरीता अतिरिक्त तालुका इमारत कामगार सुविधा केंद्र म्हणून कार्यान्वित करण्यात येईल. सदरच्या केंद्रामधील पाच पैकी तीन लिपिक लॉग-ईन आय.डी. द्वारे प्रत्येकी ५० याप्रमाणे एकूण १५० अर्ज हाताळण्यात येतील.

(क) जिल्हा इमारत कामगार सुविधा केंद्रामधील उर्वरीत दोन डाटा ऐंट्री ऑपरेटर करीता स्वतंत्र तपशिल बदल लॉग-ईन आय.डी. बनविण्यात येतील.

(ड) सदरचे लॉग-ईन आय.डी. हे बांधकाम कामगारांच्या तपशिलामध्ये बदल करण्याकरीता वापरण्यात येतील.

(इ) बांधकाम कामगारास त्यांच्या तपशिलामध्ये बदल करावयाचा असल्यास त्यांना जिल्हा इमारत कामगार सुविधा केंद्रावर उपस्थित राहून बदलाचा तपशिल सादर करावा लागेल.

(ई) बांधकाम कामगारांना त्याच्या तपशिल बदलामध्ये स्व:ताचे नाव, फोटो, जन्म दिनांक, आधार क्रमांक यामध्ये कोणताही बदल करता येणार नाही.त्यास मोबाईल क्रमांक बदलता येईल.कुटुंब सदस्यामध्ये पती/पत्नीचे नाव, दोन मुलांचे नाव , आई व वडील यांचा अंतर्भाव करण्याची मुभा राहील. मात्र एकदा अंतर्भूत केलेल्या सदस्याचे नाव वगळून अन्य सदस्याचे नाव अंतर्भूत करता येणार नाही.त्यास कुटुंबाच्या सदस्याचे आधार क्रमांक, जन्म दिनांक अंतर्भूत करता येतील मात्र आधार क्रमांक, जन्म दिनांक बदल करता येणार नाही.

(छ) जिल्हा इमारत कामगार सुविधा केंद्रामधील तपशिल बदल लॉग-ईन आय.डी. मध्ये याची नोंद घ्यावी व त्याचवेळी बांधकाम कामगारांचे फोटो (Online Photo Capturing) व त्यांच्या बोटाचे ठसे (शक्यतो अंगठा अथवा कोणतेही एक बोट) बायोमॅट्रीक पद्धतीने संगणक प्रणालीमध्ये नोंदविण्यात यावेत.

(च) बांधकाम कामगांचा तपशिल बदल अंतिम मान्यतेकरीता संबधित तालुक्याच्या नोंदणी अधिका-याकडे जाईल.

(छ) बांधकाम कामगारांच्या तपशिलामध्ये बदल करून मंडळाच्या विविध योजनांचा चुकीच्या पद्धतीने लाभ घेण्यास आळा घालणे आवश्यक आहे. अशी बाब आढळून आल्यास,जिल्हा इमारत कामगार सुविधा केंद्रामधील तपशिल बदल लॉग-ईन आय.डी. हाताळणारे डाटा ऐंट्री ऑपरेटर, संबधित बदलास मान्यता देणारे तालुका नोंदणी अधिकारी व संबधित बांधकाम कामगार यास जबाबदार राहतील.

१४. **<u>प्रलंबित नोंदणी/नुतनीकरण/लाभांच्या अर्जावर करावयाची कार्यवाही</u>**

(अ) तालुका इमारत कामगार सुविधा केंद्राच्या नोंदणी / नुतणीकरण / लाभ वाटप लिपिक लॉग-ईन आय.डी. मध्ये प्राप्त होणारे अर्ज दैनंदिन स्वरूपात निपटारा होणार असल्यामुळे सदर लिपिक लॉग-ईन आय.डी. मध्ये कोणतेही अर्ज प्रलंबित राहणार नाहीत.

(ब) सद्यस्थितीत नोंदणी/नुतनीकरण/लाभ वाटपाचे अर्ज तालुका नोंदणी अधिका-यांच्या लॉग-ईन आय.डी. मध्ये प्रलंबित आहेत.

(क) तालुका नोंदणी अधिका-यांनी त्यांच्या लॉग-ईन आय.डी. मध्ये प्रलंबित असलेल्या अर्जावर तातडीने कार्यवाही करावी व सर्व प्रलंबित अर्जांचा दिनांक ३१ मार्च,२०२५ पूर्वी निपटारा करावा.

(ड) नोंदणी/नुतनीकरणाकरीता तसेच, योजनानिहाय निश्चित केलेल्या कागदपत्रांशिवाय अन्य कागदपत्रांची मागणी करण्यात येवू नयेत व अनावश्यकपणे त्रुट्या दाखवून अर्ज नामंजूर करण्यात येवू नयेत.तथापि, सादर झालेली कागदपत्रे चुकीची/बनावट /संशयास्पद आढळून आल्यास तातडीने आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी.

१५. **मंडळ स्तरावर समन्वय कक्ष -**

(अ) उपरोक्त प्रमाणे कामकाजाचे समन्वय करण्याकरीता खालीलप्रमाणे समन्वय कक्ष गठीत करण्यात येत आहे -

(i) श्रीम. राजश्री पाटील, जिल्हा कार्यकारी अधिकारी - कक्ष प्रमुख

(ii) श्री. विनीत तायडे, लेखा अधिकारी - समन्वयक

(iii) श्री. गंगाधर तावडे, प्रकल्प संचालक
- एकात्मिक कल्याणकारी मंडळ संगणकीय प्रणाली (IWBMS) प्रतिनिधी

(iv) श्री. अभिजित सिंग, प्रकल्प संचालक
- तालुका इमारत कामगार सुविधा केंद्र कक्ष प्रतिनिधी

(अ) उपरोक्त कामाकरीता bocwdbtmonitoring@gmail.com हा पुर्णवेळ (Dedicated) ई-मेल आय.डी निर्माण करण्यात येत असून,सर्व जिल्हा कामगार सुविधा केंद्र यांनी यासंदर्भामधील कामाकरीता केवळ या ई-मेल आय.डी. वर संदर्भ करावा.

(ब) उपरोक्त कामाकरीता हा (+९१) ७४०००१२२६० हा मंडळाचा पुर्णवेळ (Dedicated) व्हॉट्सअप क्रमांक निर्माण करण्यात येत असून,सर्व जिल्हा इमारत कामगार सुविधा केंद्र, तालुका इमारत कामगार सुविधा केंद्र यांनी यासंदर्भामधील कामाकरीता केवळ या व्हॉट्सअप क्रमांक वर संदर्भ करावा.

१६. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई अंतर्गत विकसित केलेल्या एकात्मिक कल्याणकारी मंडळ संगणकीय प्रणाली (IWBMS) वर

प्रलंबित असलेल्या व यापुढे प्राप्त होणा-या सर्व नोंदणी/नुतनीकरण/लाभ वाटप अर्जावर उपरोक्त सूचनांनुसार कार्यवाही करावी. तसेच, प्रलंबित अर्जाचा नियमोचित निपटारा करून, यापुढे दैनंदिन स्वरूपात अर्जांचा निपटारा होईल याची दक्षता घेण्यात यावी.

०५/०२/२०२४

(विवेक कुमार)

**सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम**
**कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई.**

प्रत ,

१. मा.मंत्री (कामगार) तथा मा.अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई.
२. मा.प्रधान सचिव (कामगार), उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय,मुंबई.
३. मा. कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य.
४. उप सचिव (कामगार-७) , उद्योग, उर्जा व कामगार विभाग, मुंबई.
५. एकात्मिक कल्याणकारी मंडळ संगणकीय प्रणाली (IWBMS) कक्ष.
६. तालुका इमारत कामगार सुविधा केंद्र कक्ष.
७. Arceus Infotech Pvt. Ltd.
८. ITI Ltd.
९. Arceus Universal Infotech Pvt. Ltd.
१०. Just Universal Pvt. Ltd.

## प्रपत्र-अ

## नोंदणीकरीता आवश्यक कागदपत्रांचा तपशिल

१. आधारकार्ड

२. मागील एक वर्षात ९० दिवस बांधकामाचे काम केले असल्याचे प्रमाणपत्र (खाजगी बांधकाम व्यायसायिकाचे प्रमाणपत्र अथवा शासकीय प्राधिकरणाने दिलेले प्रमाणपत्र अथवा नाका कामगार पुस्तिका)

३. रक्कम रू.१/-


## प्रपत्र-ब

## नुतनीकरणाकरीता आवश्यक कागदपत्रांचा तपशिल

१. मागील एक वर्षात ९० दिवस बांधकामाचे काम केले असल्याचे प्रमाणपत्र (खाजगी बांधकाम व्यायसायिकाचे प्रमाणपत्र अथवा शासकीय प्राधिकरणाने दिलेले प्रमाणपत्र अथवा नाका कामगार पुस्तिका)

२. रक्कम रू.१/-

## प्रपत्र – क नोंदणी/नुतनीकरण अर्ज प्रक्रिया



## प्रपत्र - ड

## लाभाच्या अर्जाकरीता योजनानिहाय आवश्यक कागदपत्रांचा तपशिल

| अ.क्र. | योजना प्रकार | योजना क्रमांक | योजनेचे नाव | आवश्यक कागदपत्रे |
|---|---|---|---|---|
| १ | शैक्षणिक सहाय्य योजना | E-०१ | नोंदणीकृत बांधकाम कामगारांच्या पहिल्या दोन पाल्यांना इयत्ता १ ली ते ७ वी साठी प्रतिवर्षी रु.२,५००/- आणि इयत्ता ८ वी ते १० वी साठी प्रतिवर्षी रु.५,०००/- शैक्षणिक अर्थसहाय्य | मागील शैक्षणिक वर्षात ७५% उपस्थिती असल्याचे प्रमाणपत्र<br>चालू शैक्षणिक वर्षाचे बोनाफाईड प्रमाणपत्र<br>पाल्याचे आधार कार्ड<br>शिधापत्रिका<br>अर्जदारांच्या बॅक पासबुकची प्रत |
| २ | | E-०२ | नोंदणीकृत बांधकाम कामगारांच्या पहिल्या दोन पाल्यांना इयत्ता १० वी व इयत्ता १२ वी मध्ये किमान ५०% किंवा अधिक गुण मिळाल्यास रु.१०,०००/- शैक्षणिक अर्थसहाय्य. | इयत्ता १० वी अथवा इयत्ता १२ वी मध्ये ५०% पेक्षा अधिक गुण मिळाल्याची गुणपत्रिका<br>चालू शैक्षणिक वर्षाचे बोनाफाईड प्रमाणपत्र<br>महाविद्यालयाचे ओळखपत्र<br>पाल्याचे आधार कार्ड<br>शिधापत्रिका<br>अर्जदारांच्या बॅक पासबुकची प्रत |
| ३ | | E-०३ | नोंदणीकृत बांधकाम कामगारांच्या पहिल्या दोन पाल्यांना इयत्ता ११ वी व इयत्ता १२ वी च्या शिक्षणासाठी प्रती शैक्षणिक वर्षी रु.१०,०००/- | चालू शैक्षणिक वर्षाचे बोनाफाईड प्रमाणपत्र<br>महाविद्यालयाचे ओळखपत्र<br>पाल्याचे आधार कार्ड<br>शिधापत्रिका<br>अर्जदारांच्या बॅक पासबुकची प्रत |
| ४ | | E-०४ | नोंदणीकृत बांधकाम कामगारांच्या पहिल्या दोन | चालू शैक्षणिक वर्षाचे बोनाफाईड प्रमाणपत्र |

| अ.क्र. | योजना प्रकार | योजना क्रमांक | योजनेचे नाव | आवश्यक कागदपत्रे |
|---|---|---|---|---|
| | | | पाल्यांना आणि पत्नीस/पतीस पदवी च्या प्रथम, द्वितीय व तृतीय वर्ष प्रवेश, पुस्तके व शैक्षणिक सामुग्रीसाठी प्रतिवर्षी रु.२०,०००/- | महाविद्यालयाचे ओळखपत्र<br>पाल्य/पती/पत्नीचे आधारकार्ड<br>शिधापत्रिका<br>अर्जदारांच्या बॅक पासबुकची प्रत |
| ५ | | E-०५ | नोंदणीकृत बांधकाम कामगारांच्या पहिल्या दोन पाल्यांना आणि पत्नीस/पतीस वैद्यकीय पदवी अभ्यासक्रमाकरिता प्रतिवर्षी रु.१,००,०००/- व अभियंत्रिकी पदवी अभ्यास क्रमाकरीता रु.६०,०००/- | चालू शैक्षणिक वर्षाचे बोनाफाईड प्रमाणपत्र<br>महाविद्यालयाचे ओळखपत्र<br>पाल्य/पती/पत्नीचे आधारकार्ड<br>शिधापत्रिका<br>अर्जदारांच्या बॅक पासबुकची प्रत |
| ६ | | E-०६ | नोंदणीकृत बांधकाम कामगारांच्या पहिल्या दोन पाल्यांना पदविकेकरिता प्रतीवर्षी रु.२०,०००/- व पदव्युत्तर पदवी करिता रु.२५,०००/- | चालू शैक्षणिक वर्षाचे बोनाफाईड प्रमाणपत्र<br>महाविद्यालयाचे ओळखपत्र<br>पाल्याचे आधार कार्ड<br>शिधापत्रिका<br>अर्जदारांच्या बॅक पासबुकची प्रत |
| ७ | | E-०७ | नोंदणीकृत बांधकाम कामगारांच्या पहिल्या दोन पाल्यांना संगणकाचे शिक्षण (MS-CIT) करिता शुल्काची प्रतिपुर्ती | संगणकाचे शिक्षण (MS-CIT) उत्तीर्ण प्रमाणपत्र<br>MS-CIT शुल्काची पावती<br>पाल्याचे आधार कार्ड<br>शिधापत्रिका<br>अर्जदारांच्या बॅक पासबुकची प्रत |

| अ.क्र. | योजना प्रकार | योजना क्रमांक | योजनेचे नाव | आवश्यक कागदपत्रे |
|---|---|---|---|---|
| ८ | आरोग्य विषयक योजना | H-०१ | नोंदीत बांधकाम कामगाराच्या पहिल्या दोन जिवित अपत्यांच्या नैसर्गिक प्रसुतीसाठी रु.१५,०००/- व शस्त्रक्रियेव्दारे प्रसुतीसाठी रु.२०,०००/- | **नैसर्गिक प्रसुतीसाठी** - अपत्याचे जन्म नोंदणी प्रमाणपत्र<br>**शस्त्रक्रियेव्दारे प्रसुतीसाठी-** अपत्याचे जन्म नोंदणी प्रमाणपत्र व शस्त्रक्रियेद्वारे प्रसुती झाल्याचे वैद्यकीय अधिकारी प्रमाणपत्र. |
| | | | | शिधापत्रिका |
| | | | | अर्जदारांच्या बॅक पासबुकची प्रत |
| ९ | | H-०२ | नोंदीत बांधकाम कामगार व त्यांच्या कुटुंबियांना गंभीर आजाराच्या उपचारार्थ रु.१,००,०००/- ( एका सदस्यास केवळ एकदाच आणि कुटूंबातील दोन सदस्यांपर्यत मर्यादित) तथापि, आरोग्य विमा योजना लागू नसल्यासच सदर योजनेचा लाभ अनुज्ञेय असेल. | जिल्हा शल्यचिकित्सक अधिकाऱ्यांनी आजार असल्याबाबत दिलेले प्रमाणपत्र |
| | | | | निवडलेल्या कुटुंब सदस्याचे आधार कार्ड. |
| | | | | वैद्यकीय खर्चाची देयक |
| | | | | शिधापत्रिका |
| | | | | अर्जदारांच्या बॅक पासबुकची प्रत |
| १० | | H-०३ | पती/पत्नीने पहिल्या मुलीच्या जन्मानंतर कुटूंब नियोजनाची शस्त्रक्रिया केल्यास त्या मुलीच्या नावे राष्ट्रीयकृत बँकेत १८ वर्षापर्यंत रु.१,००,०००/- मुदत बंद ठेव | पती/पत्नीने पहिला मुलीच्या जन्मानंतर कुटूंब नियोजनाची शस्त्रक्रिया केल्याबाबतचे स्वयंघोषणापत्र. |
| | | | | जिल्हा शल्यचिकित्सक यांनी दिलेले कुटुंबनियोजन शस्त्रक्रियेबाबतचे प्रमाणपत्र |
| | | | | निवडलेल्या मुलीचे आधार कार्ड. |
| | | | | अपत्य जन्म नोंदणी प्रमाणपत्र |


| अ.क्र. | योजना प्रकार | योजना क्रमांक | योजनेचे नाव | आवश्यक कागदपत्रे |
|---|---|---|---|---|
| | | | | शिधापत्रिका |
| | | | | अर्जदारांच्या बॅक पासबुकची प्रत |
| ११ | | H-०४ | नोंदीत बांधकाम कामगारास ७५% अपंगत्व आल्यास रु.२,००,०००/- अर्थसहाय्य | ७५% अपंगत्व असल्याचे जिल्हा शल्यचिकित्सक प्रमाणपत्र |
| | | | | शिधापत्रिका |
| | | | | अर्जदारांच्या बॅक पासबुकची प्रत |
| १२ | आर्थिक सहाय्य योजना | F-०१ | नोंदणीकृत बांधकाम कामगाराचा बांधकामाच्या ठिकाणी अपघाती मृत्यु झाल्यास त्याच्या कायदेशीर वारसास रु.५,००,०००/- | मृत्यु प्रमाणपत्र |
| | | | | नामनिर्देशित/वारसाच्या बॅक पासबुकची प्रत |
| | | | | नामनिर्देशित/वारसदार व्यक्तीचे आधारकार्ड |
| | | | | पोलिस प्रथम खबरी अहवाल व पंचनामा |
| | | | | नामनिर्देशित व्यक्ती उपलब्ध नसल्यास वारस प्रमाणपत्र |
| | | | | शिधापत्रिका |
| १३ | | F-०२ | नोंदणीकृत बांधकाम कामगाराचा नैसर्गिक मृत्यु झाल्यास रु.२,००,०००/- | मृत्यु प्रमाणपत्र |
| | | | | नामनिर्देशित/वारसाच्या बॅक पासबुकची प्रत |
| | | | | नामनिर्देशित/वारसदार व्यक्तीचे आधारकार्ड |
| | | | | नामनिर्देशित व्यक्ती उपलब्ध नसल्यास वारस प्रमाणपत्र |
| | | | | शिधापत्रिका |

| अ.क्र. | योजना प्रकार | योजना क्रमांक | योजनेचे नाव | आवश्यक कागदपत्रे |
|---|---|---|---|---|
| १४ | | F-०३ | नोंदणीकृत बांधकाम कामगाराच्या गृहकर्जाच्या व्याजाच्या रकमेवर रू.२.०० लक्ष अनुदान | राष्ट्रीयकृत बँकेचे कमाल १० वर्षाकरीता रू.६.०० लक्षपेक्षा जास्त गृहकर्ज मंजूर पत्र (Loan Sanction Letter) |
| | | | | राष्ट्रीयकृत बँकेचे सुरू आर्थिक वर्षाचे व्याज प्रमाणपत्र (Interest Certificate) |
| | | | | सदरच्या कर्जाच्या व्याजापोटी मंडळाकडून रू.२.०० लक्ष पेक्षा जास्त लाभ घेतला नसल्याचे स्वयंघोषणापत्र |
| | | | | स्वत:च्या अथवा पती/पत्नीच्या नावे यापूर्वी घर नसल्याचे स्वयंघोषणापत्र |
| | | | | पती व पत्नीच्या नावे संयुक्त घर असल्याचा पुरावा |
| | | | | गृहकर्जाच्या विम्याचे पत्र |
| | | | | शिधापत्रिका |
| | | | | अर्जदारांच्या बॅक पासबुकची प्रत |
| १५ | | F-०५ | नोंदणीकृत बांधकाम कामगाराचा मृत्यु झाल्यास त्याच्या अंत्यविधीकरिता रु.१०,०००/- | मृत्यु प्रमाणपत्र |
| | | | | नामनिर्देशित/वारसाच्या बॅक पासबुकची प्रत |
| | | | | नामनिर्देशित/वारसदार व्यक्तीचे आधारकार्ड |
| | | | | नामनिर्देशित व्यक्ती उपलब्ध नसल्यास वारस प्रमाणपत्र |
| | | | | शिधापत्रिका |

| अ.क्र. | योजना प्रकार | योजना क्रमांक | योजनेचे नाव | आवश्यक कागदपत्रे |
|---|---|---|---|---|
| १६ | | F-०६ | नोंदणीकृत बांधकाम कामगाराचा मृत्यु झाल्यास त्याच्या विधवा पत्नी अथवा स्त्री कामगाराच्या विधुर पतीस रु.२४,०००/- (५ वर्षाकरिता), (प्रति वर्षी अर्ज करणे आवश्यक राहील) | मृत्यु प्रमाणपत्र |
| | | | | विवाह प्रमाणपत्राची प्रत |
| | | | | पती/पत्नीच्या बॅक पासबुकची प्रत |
| | | | | पती/पत्नीचे आधारकार्ड |
| | | | | शिधापत्रिका |
| १७ | | F-०८ | अपघाती/नैसर्गिक मृत्यु झालेल्या नोंदीत कामगार लाभार्थीचे शव शववाहिलीव्दारे मूळ गावी पाठवणीसाठी एस.टी महामंडळाच्या आगर प्रमुख्याने | मृत्यु प्रमाणपत्र |
| | | | | नामनिर्देशित/वारसाच्या बॅक पासबुकची प्रत |
| | | | | नामनिर्देशित/वारसाच्या व्यक्तीचे आधारकार्ड |
| | | | | नामनिर्देशित व्यक्ती उपलब्ध नसल्यास वारस प्रमाणपत्र |
| | | | | राज्य परिवहन महामंडळाचे आगार व्यस्थापक, महाराष्ट्र राज्य यांचे अंतर प्रमाणित करण्याचे प्रमाणपत्र |
| | | | | शिधापत्रिका |
| १८ | सामाजिक सुरक्षा व अन्य योजना | S-०१ | नोंदीत बांधकाम कामगाराच्या पहिल्या विवाहाच्या खर्चाच्या प्रतिपूर्तीसाठी रु.३०,०००/- | बांधकाम कामगाराचे पहिले विवाह असल्याबाबतचे स्वयंघोषणापत्र |
| | | | | विवाहचे प्रमाणपत्र |
| | | | | पती/पत्नीचे आधारकार्ड |
| | | | | शिधापत्रिका |
| | | | | अर्जदारांच्या बॅक पासबुकची प्रत |

| अ.क्र. | योजना प्रकार | योजना क्रमांक | योजनेचे नाव | आवश्यक कागदपत्रे |
|---|---|---|---|---|
| १९ | | S-०५ | नोंदीत बांधकाम कामगारांसाठी प्रधानमंत्री जीवनज्योती विमा योजना. रु. ३३०/- | अर्जदारांच्या बँक पासबुकच्या पहिल्या पृष्ठांवरील नोंदीची प्रत |
| | | | | चालू आर्थिक वर्षात रक्कम वजावट झाल्याचे पासबुक पृष्ठांची प्रत. |
| २० | | S-०६ | नोंदीत बांधकाम कामगारांसाठी प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना रु. १२/- | अर्जदारांच्या बँक पासबुकच्या पहिल्या पृष्ठांवरील नोंदीची प्रत |
| | | | | चालू आर्थिक वर्षात रक्कम वजावट झाल्याचे पासबुक पृष्ठांची प्रत. |
| २१ | | S-१३ | नोंदीत बांधकाम कामगाराच्या एका मुलीच्या विवाह करीता रु.५१,०००/- एवढे अर्थसहाय्य देणे | बांधकाम कामगाराचे एका मुलीच्या विवाह करीता अर्थसहाय्य घेत असल्याचे स्वयंघोषणापत्र |
| | | | | मुलीचे विवाहाचे प्रमाणपत्र |
| | | | | मुलीचा जन्माचा दाखला |
| | | | | शिधापत्रिका |
| | | | | अर्जदारांच्या बँक पासबुकची प्रत |

## प्रपत्र-इ – लाभाचे अर्ज प्रक्रिया



# प्रपत्र - ई

## रबर स्टॅम्प नमुना

| |
|---|
| **तालुका कामगार सुविधा केंद्र, -----** |
| लॉग-ईन आय.डी. धारक - ------------------- |
| शेरा - सर्व मुळ कागदपत्रे योग्य |

| |
|---|
| **तालुका कामगार सुविधा केंद्र, -----** |
| लॉग-ईन आय.डी. धारक - ------------------- |
| शेरा - ----------------- हे मुळ कागदपत्र अपूर्ण |